# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१४८ दिनांक - १९/०४/२०२४

## अर्नाळा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील हद्दपार करण्यात आलेल्या सराईत आरोपीस अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष - ३ विरार यांना यश

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक - २०२४ ची प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडावी या अनुषंगाने मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत विवीध पोलीस ठाण्यांचे कार्यक्षेत्रातील पाहिजे फरारी आरोपींचा शोध घेणे, हद्दपार करण्यात आलेल्या इसमांच्या वास्तव्याबाबत खात्री करुन त्यांचे विरुध्द कारवाई करणे बाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना प्राप्त झाल्या आहेत.

अर्नाळा सागरी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात रहाणारा सराईत आरोपी नामे मुकेश उर्फ माका विनोद मांगेला रा. टेंभी पाडा, आगाशी, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर याला मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ विरार, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडील आदेश क्रमांक पो.उप.आ./परि-३/हद्दपार आदेश-०४/४०९२/२०२२ दिनांक- ०१/११/२०२२ अन्वये पालघर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्हयांच्या कार्यक्षेत्रांच्या हद्दीतून दोन (२) वर्षे कालावधीकरीता हद्दपार करण्यात आले आहे.

हद्दपार करण्यात आलेला सराईत आरोपी मुकेश उर्फ माका विनोद मांगेला वय- ३१ वर्षे, रा. टेंभी पाडा, आगाशी, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर हा कोणत्याही सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेतल्याशिवाय त्याला हद्दपार करण्यात आलेल्या क्षेत्रातील शनि मंदीर जवळ, टेंभी पाडा, आगाशी, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर या ठिकाणी आला असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्याला गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने दिनांक १८/०४/२०२४ रोजी १४.३० वा. चे सुमारास टेंभी पाडा, आगाशी, विरार पश्चिम येथून ताब्यात घेतले आहे. त्याने हद्दपार आदेशाचा भंग केल्याने त्याचे विरुध्द अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. १६७/२०२४ भा.दं.वि.सं.कलम १८८ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ (अ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद हद्दपार आरोपी मुकेश उर्फ माका विनोद मांगेला याचे विरुध्द अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे अभिलेखावर गर्दी मारामारी, दुखापत, सरकारी नोकरास अडथळा निर्माण करणे, जबरी चोरी असे १० पेक्षा जास्त गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तसेच नमुद हद्दपार आरोपीत याचा अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर १६५/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३२६,३२३,५०४,५०६,१४१,१४३,१४४,१४७,१४९ प्रमाणे दिनांक १७/०४/२०२४ रोजी दाखल असलेल्या गुन्हयात देखील सहभाग निश्चीत झाला आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे), मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मनोज चव्हाण, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा./सागर बारवकर, पो.अं./ राकेश पवार, पो.अं/ सुनिल पाटील, पो.अं./ सुमित जाधव, म.सु.ब/ सागर सोनवणे, म.सु.ब./ गणेश यादव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.